# लोकरंग

प्रा. चंद्रकुमार नलगे
डॉ. गंगाधर पानतावणे

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

B132

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**लोकरंग : चंद्रकुमार नलगे, गंगाधर पानतावणे**
'चंद्रबन', साहित्य निवास कॉलनी,
उजळाईवाडी, कोल्हापूर.
फोन : ०२३१ - २६७७०३४

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये १७०/-

मित्रवर्य
भास्कर चंदनशिव
आणि
वसंत केशव पाटील
यांनाच...

# दर्शन : ‘लोकरंग’च्या पूर्वरंगाचे

अलीकडील काळात जीवनाच्या नवप्रवाहाबरोबरच मराठी साहित्यातही नवीन वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले. त्यांचा विलक्षण प्रभाव जनमानसावर तसेच साहित्यातही पडलेला आहे. त्यामुळे साहित्यक्षेत्रालाही एक नवी सबल जाग आल्यासारखी झाली आहे. सामाजिक स्थितीगतींच्या परिवर्तनाचा वेध घेणारे साहित्यही नवप्रेरणांनी झळाळून गेल्यासारखे वाटते. त्याच्या कक्षा निश्चितपणे विस्तारित झाल्या आहेत. म्हणूनच आजच्या काळातील साहित्यातील विविध प्रवाहांचा चेहरामोहरा निरखून, पारखून पाहण्यासारखा आहे.

अशा नव वाङ्मयीन प्रवाहांपैकी दलित साहित्याच्या प्रवाहाने आपल्या धगधगीत अनुभवविश्वाने आपली मुद्रा मराठी साहित्यात उमटवली आहे. त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास व्हावा, यासाठी आम्ही निवडक दलित कथालेखकांच्या कथांचे संपादन ‘दलित कथा’ या नावाने केले. अशा पहिल्याच निवडक ‘दलित कथा’ संग्रहाचे स्वागत सर्व स्तरांवर चांगलेच झाले. त्यातील काही कथांची इंग्रजीत भाषांतरे झाली. शिवाजी विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, इंदूर विद्यापीठ, कर्नाटक विद्यापीठ या विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमात या पुस्तकाचा समावेश केला आहे.

दलित साहित्यातील आणखी एक तरारून आलेला हुंकार म्हणजे दलितांची आत्मकथने. मराठी साहित्यात 'आत्मकथन' हा शब्दप्रयोग प्रथम आला तो या शतकानुशतके सर्वस्वाला वंचित राहिलेल्या दलितांच्याच आत्मकथनांमुळे ! आतापर्यंत उपेक्षित, दुर्लक्षित राहिलेल्या समाजातील जाती-जमातीतील लेखकांनी आपल्या भोगल्या जीवनाची जळजळीत, परखड, प्रामाणिक आत्मकथने लिहिली. त्यातील निवडक लेखकांच्या आत्मकथनातील उतारे निवडून पहिलेच 'दलित आत्मकथन' हे पुस्तक संपादित केले. त्यालाही अपेक्षेपेक्षा प्रतिसाद मिळाला. दै. लोकसत्ताने तर या पुस्तकावरच अग्रलेख लिहून त्याचा गौरव केला. शासनाच्यावतीने डॉ. जब्बार पटेल यांनी महाराष्ट्र राज्य रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त निर्माण केलेल्या, 'महाराष्ट्र राज्याची पंचवीस वर्षांची वाटचाल' या माहितीपटात त्याची नोंदही घेण्यात आली आहे. शिवाय सागर विद्यापीठ (मध्यप्रदेश), इंदूर विद्यापीठ, कर्नाटक विद्यापीठ यांनी आपल्या अभ्यासक्रमात हे पुस्तक नियुक्त करून प्रतिदाद दिली.

आजचा दुसरा वाङ्मयीन प्रवाह म्हणजे ग्रामीण-प्रादेशिक साहित्य. त्याचाही ठसठशीत ठसा मराठी साहित्यात उमटलेला आहे. त्यातील कथा, कादंबरी इ. वाङ्मय प्रकारांनी एकूणच मराठी साहित्यात गुणात्मक भर घातली आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण जीवनातील विविध समृद्ध अनुभवांचे सकस चित्रण करणारे ललित लेखनही झाले आहे. आता तर ग्रामसंस्कृतीतील नव्या नव्या जाणिवांचे भावस्पर्शी दर्शन अत्यंत उत्कटपणे ललित लेखांच्या रूपाने होत आहे. अशा ग्रामीण जीवनाचा मागोवा घेणाऱ्या ललित लेखांचा एक वाङ्मयीन अनुबंध संकलित व्हावा, या प्रकारच्या नव्या ललित लेखनाचा अभ्यास व्हावा म्हणून हा नवा संकल्प केला. महाराष्ट्राच्या वैविध्यपूर्ण प्रादेशिक जीवनाचे रंग, पैलू, संदर्भ ज्या ललित लेखांतून प्रतिबिंबित झाले आहेत, असे ललितलेख निवडले. सिद्धहस्त साहित्यिक मान्यवरांना संमतीसाठी विनंती केली. त्यांनीही ही कल्पना मनापासून आवडल्याने उतारे घेण्यास परवानगी दिली. तेव्हाच प्रादेशिक महाराष्ट्राचे हे 'लोकरंग' आपल्यापर्यंत पोचवता आले. त्या सर्वांचेच अत्यंत ऋणी आहोत.

'लोकरंग'चे रूपरंग तयार होत असता मा. व्यंकटेश माडगूळकर, प्रा. आनंद यादव, प्रा. केशव मेश्राम, प्रा. बापूराव जगताप, प्रा. फ. मुं. शिंदे, प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्राचार्य ए. आर. साळुंखे, प्राचार्य एस. आर. सूर्यवंशी, प्रा. एस. एन. पाटील, जयंत सबनीस, टी. ए. पाटील, प्रा. वसंतराव देसाई, अनंत तिबिले यांचे प्रेमळ सहकार्य लाभले. प्रा. सौ. मंदाकिनी, श. चांदेकर यांचा लोभ लोकरंगच्या पाठीमागे होताच, तसेच ग्रंथालयाच्या शोधवाटा श्री. मधुकर शिरगावकर, रवी चपाले, आनंद शिंदे, बिभीषण पाटील, शिवाप्पा मादर, प्रताप पाटील, गोपाळ पाटील, धोंडीराम पाटील यांनीच दाखविल्या, म्हणून हे लोकरंग खुले झाले.

'लोकरंग'ला देखणे सौष्ठव लाभले ते कल्पना मुद्रणालयाचे मा. अण्णासाहेब लाटकर, ख्यातनाम चित्रकार सुभाष अवचट यांच्यामुळेच. सुरेश एजन्सीचे मा. बाळासाहेब कारले यांच्या मुग्ध, गोड, लोभस व्यक्तिमत्त्वामुळेच अशी नक्षत्रांची गावे डवरून येतात. ही दुसरी आवृत्ती अजब पब्लिकेशन्सचे मा. उल्हास मेहतासो, श्री. शीतल मेहता यांच्या प्रेमामुळे दिमाखदार स्वरूपात प्रकाशित होत आहे. सर्वांचेच आभारी आहोत.

**– संपादक**

# निमित्त : लोकरंग

अलीकडे मराठी साहित्य, विविध दालनांनी समृद्ध होऊ लागलेले आहे. अलक्षित व अव्यक्त जीवनानुभव साहित्याचा विषय होऊन त्याला एक व्यापकता प्राप्त होऊ लागलेली आहे. दलित आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव कथा, कविता, नाट्य, कादंबरी आणि ललित लेखनाचा विषय होऊ लागले आहे. कोंडीत / आवर्तात अडकून पडलेल्या साहित्याला नवा स्पर्श होऊन साहित्याचे नवनवे उन्मेष तरारून येऊ लागले आहेत. साहित्याला हे एक प्रकारचे योगदानच होय. साहित्यात किंवा समाजात जेव्हा नव्या परिवर्तनाची चाहूल येते; तेव्हा ते नवे चटकन् स्वीकारले जात नाही. परंतु कालांतराने त्याला साहित्याचे अक्षरत्व येते. हा साहित्याचा विकासक्रम असतो. तो नाकारून चालत नाही. मराठी ललित लेखनाच्या प्रांतातही ग्रामीण आणि दलित जीवनाचे हुंकार उमटू लागले आहेत. साचेबंद ललित लेखनाला एक दिशा प्राप्त होऊ लागली आहे, हे सुचिन्ह होय.

मराठी ललित लेखन कधीही सर्वस्पर्शी नव्हते. त्यामुळेच तेथे एक आवर्त निर्माण होत गेले. कोणताही साहित्यप्रकार जेव्हा साचेबंद होतो तेव्हा त्याची काही वैशिष्ट्येही स्थिर अशा स्वरूपात जाणवत राहतात. काही ठोकताळे निर्माण होतात. त्या त्या साहित्यप्रकाराला विशिष्ट असे रूप प्राप्त होते. हे रूप त्याची सीमाच असते. परंतु ही सीमा उल्लंघिण्याचे कार्यही होत असते आणि नवे रूप पुन: प्राप्त होत असते.

आजच्या ललित लेखनाचे पूर्वस्वरूप असलेल्या निबंधवाङ्मय प्रकारापासून हे घडत आले आहे. त्याचा विचार करणे प्रस्तुतच ठरेल.

एखादा विचार सुसंगतरित्या मांडण्याच्या हेतूने निबंध जन्माला आला. हा निबंध राजकारण, समाजकारण, अर्थशास्त्र किंवा इतिहास अशा विषयांशी निगडित राहून नंतर आपल्या विचारक्षेत्रांच्या दिशा निश्चित करीत राहिला. तर्कशास्त्र आणि सूत्रबद्ध प्रतिपादनाचा वेष परिधान करून मराठी निबंधाने, आपली अनेक वैशिष्ट्ये प्रदर्शित केली असली तरी, आपला विचार, आपले मत, किंवा आपला सिद्धांत मांडण्याचा हव्यासही जोपासला गेला. क्वचित चित्तवेधकता असली तरी अनिर्बंधता हा निबंधाचा स्वभावधर्म राहिला. निबंधाच्या या सांकेतिकतेतूनच 'गुजगोष्टी' किंवा 'लघुनिबंधा' चा उदय झाला. लघुनिबंधाने आपला नवा संसार उभा केला. निबंधातील तर्कनिष्ठा, उपदेशपरता, बंदिस्तपणा, रूक्षता, विचारप्रधानता अव्हेरून आत्मपरता आणि आत्माविष्कार यांचा आश्रय घेतला. पाल्हाळिकपणापेक्षा मन:पूर्वकता आणि दीर्घाकारापेक्षा लघू आकार अस्तित्वात आला. 'I am my-self the subject of my book' या आद्य लघुनिबंधकार माँतेन यांच्या उद्‍गाराला लघुनिबंधकारांनी प्रमाण मानले. मनोरंजकता आणली. नाट्यात्मता, कल्पनारम्यता आणि भावार्थतेला स्थान प्राप्त झाले. चिंतनशीलता आली. मानवी जीवनातील घडामोडींना सौंदर्यात्म दृष्टिकोनातून शब्दांकित करण्यात येऊ लागले. रेखीवपणा व आखीवपणाही आला. लघुनिबंध अशा विविधतेने नटू लागला. कालांतराने येथेही एक आवर्त निर्माण झाले. लघुनिबंध म्हणजे मनोरंजन, स्वैरता, विषयांतर, उथळपणा, खेळकरपणा, सुभाषितांची पेरणी, विनोदाची झालर, असे काहीसे स्वरूप रूढ झाले. एक प्रकारचा साचेबंदपणा निर्माण झाला. तांत्रिकता आली. लालित्यही आले. मग लघुनिबंध याऐवजी 'ललित निबंध' असा शब्दप्रयोगही प्रचारात आला. ललितनिबंधाचा विषय सामान्य असावा, त्यात पांडित्यप्रदर्शन असू नये, लेखकाने आपल्या जीवनातील हलक्याफुलक्या गोष्टीतही सौंदर्य/ काव्य हुडकावे आणि मार्मिकतेने त्याचे दर्शन घडवावे, असे काही संकेत स्थिर झाले. या संकेतांनाच यशस्वी लेखनाची मुद्रा डकविण्यात आली आणि त्याचे दुष्परिणामही झाले. लेखक आपल्या जीवनातील अति सामान्य घटनांतही काव्य शोधण्याचा अट्टहास करू लागला आणि ते शब्दांकित करण्यात समाधान मानू लागला. 'लेखकाचे अंतरंग लघुनिबंध जेवढे उघडे दाखवील, लेखकाच्या आवडीनिवडी, त्याचे रागलोभ, त्याने केलेल्या चुका, पांडित्याचे यत्किंचितही प्रदर्शन न करता जेवढ्या प्रमाणात लघुनिबंधातून प्रकट होतील तेवढी लघुनिबंधाची गोडी वाढते.' अशी विचारसरणी स्थिर होऊ लागली. अशा गृहीततत्त्वामुळे लघुनिबंधातील आत्मपरतेला आत्मचरित्रपर लेखनाचेही स्वरूप आले आणि लेखकाच्या व्यक्तित्वाचे रंग पुसट होत गेले. पण ही सांकेतिकता बदलण्याचेही प्रयत्न झाले. लघुनिबंधातील संकोचकल्पना विरून नवे धुमारे फुलू लागले. एका विशिष्ट वृत्तीतून केलेले जीवनानुभवांचे अवलोकन, परंतु त्यांची विविध रूपे शब्दांकित होऊ लागली. नवे अनुभव आणि नव्या जाणिवा समर्थपणे व सकसपणे अवतरू लागल्या. अनुभवाचे व चिंतनाचे क्षेत्र विस्तारले. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे कधी गडदगहिरे तर कधी तरल–संवेदनक्षम असे रंग आविष्कृत होऊ लागले. हे रंग कधी निसर्गात रमले तर कधी विविध भावकृतीत व मनोवृत्तीत. आयुष्यातील अनेक घटनांना, ह्या व्यक्तित्वरंगांनी सोनस्पर्श केला तर कधी अप्रकट मनाचे बांध मुक्त करण्यासाठी वाट करून दिली. अनुभवांच्या व्याप्तीचे जग असे विस्तारले आणि मग व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णने, पत्रलेखन, उपहासजन्य लेखन अशी दालने अस्तित्वात आली. ह्या संकुलाला 'ललित गद्य' अशी संज्ञा दिली गेली.

'ललित गद्य' ही संज्ञा व्यापक आहे. पूर्वीच्या लघुनिबंधापासून ललित गद्याचे आपले वेगळे असे बस्तान बांधले. 'ललित गद्य' ही संज्ञा अर्थपूर्ण की अर्थसंकोच करणारी अशी चर्चाही झाली. मग गद्य आणि ललित यांचा अन्योन्य संबंध काय? गद्याला लालित्याचा स्पर्श होतो तरी केव्हा? असे विविध प्रश्न उपस्थित झाले. प्रा. वा. ल. कुलकर्णी म्हणाले, 'लेखन हे गद्य असो वा पद्य असो ते ललित ह्या पदवीस तेव्हाच योग्य ठरते की जेव्हा तद्‍द्वारा एखादा अनन्यसाधारण अनुभव अक्षरश: साक्षात् होतो.' ('आजचे मराठी गद्य' महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जाने. फेब्रु. मार्च १९६१) तेव्हा लेखक आपल्या अनुभवाला साक्षात् करतो म्हणजे नेमके काय करतो तर त्याला जे काही उत्कटपणे जाणवले असेल ते आत्मानुभूत तो कल्पनाशक्तीच्या साहाय्याने प्रकट करतो. त्याच्या आत्मानुभूतीला आकार येतो. एक रूप प्राप्त होते. ही रूपात्मता प्रकट होताना शब्दांना लालित्याचा स्पर्श होतो. हा अर्थपूर्ण अनुभव 'मी'चे मन व्यक्त करीत असतो. म्हणून ललित गद्यलेखनात 'मी' हा केंद्रवर्ती आहे.

ह्या 'मी'ची विविध रूपे ललित गद्यातील विविध दालनांत समृद्धपणे व्यक्त झालेली दिसून येतात. फडके-खांडेकरांच्या लघुनिबंधांच्या सांकेतिकतेतून मुक्त होऊन दुर्गा भागवत, विंदा करंदीकर, गो. रा. दोडके, इरावती कर्वे, पु. ल. देशपांडे, रा. भि. जोशी, ना. मा. संत, वि. वा. शिरवाडकर यासारख्या लेखकांच्या लेखनातून, ललित गद्याच्या रूपासंबंधीच्या नव्या जाणिवा प्रकट झाल्या. प्रसंग, घटना, व्यक्ती, मानवी व्यवहार यातील संगती आणि असंगती यांचा शोध भावनिक आणि वैचारिक या दोन्ही पातळ्यांवर ह्या लेखकांनी घेतला. लघुनिबंधातील सांकेतिकता मोडण्याचा हा पवित्रा होता. स्वाभाविकता, सहजता आणि नैसर्गिकता ही अनुभव घेण्याच्या आणि मांडण्याच्या प्रवासातील आकाररूपे होती. यातूनच आत्मवर्तित्वापेक्षा चिंतनशीलता आणि आत्मप्रेमापेक्षा आत्मशोध यांचे दर्शन मराठी साहित्याला घडले. यातही कालांतराने सांकेतिकता येत गेली हे मान्यच केले पाहिजे. परंतु आपल्या व्यक्तिमत्त्वाचे विविध रंग प्रकट करणाऱ्या अनेक वाटा मराठीतील ललित लेखनाच्या रूपाने अस्तित्वात आल्या ह्यात शंका नाही. ग्रामीण वा दलित जीवनाची अनुभवसृष्टी, भाषा, शब्दधन ह्यांनी ललित लेखनाचे नवे अंकुर जोपासले, आणि ही बाब मराठी ललित लेखनाच्या दृष्टीने लक्षणीय मानावी लागेल. 'लोकरंग' ही त्याची एक साक्ष आहे.

आजवरचे बव्हंशी मराठी ललित लेखन हे मध्यमवर्गीय किंवा नागरी तरी राहिलेले आहे. म्हणूनच मराठी ललित लेखन हे सर्वस्पर्शी नव्हते असे जे प्रारंभी म्हटले ते याच अर्थाने. अलीकडे मात्र ह्या अलक्षित जीवनाचा आणि मनांचा वेध घेतला जात आहे. या लेखनातून प्रादेशिकता आली, प्रादेशिक बोली आली. ग्रामीण जीवन व लोकव्यवहार आला. या सर्वांशी भावनिक व वैचारिक अनुबंध जोडले गेले. आपल्या लेखनासाठी ग्रामीण परिसर किंवा ग्रामीण भाषा निवडणे ही एक 'ट्रिक' ठरू शकते. त्यातून निर्जिवताही येण्याची शक्यता असते. परंतु ग्रामीण वा दलित संस्कृतीशी, लोक व्यवहाराशी एकरूप झालेलं संवेदनशील मन लेखनातून व्यक्त होणं म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा एक नवा आशय प्रकट करणे होय. असे व्यक्तिमत्त्वाचे विविध रंग 'लोकरंग' मध्ये अनुस्यूत आहेत. त्यातून लोकसंस्कृतीचं दर्शन तर घडतेच परंतु जीवनाकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोनही प्रस्फुरित होतात. निसर्ग, व्यक्ती, घटना, स्मृती यांना एक व्यक्तिमत्त्व लाभते. लेखक आणि लोकसंबद्ध घटक संवादी बनतात. मग गावाकडच्या आठवणींनी मोहरून आलेलं ग. दि. माडगुळकरांचं मन, पायवाटांशी संवाद करताना जणू त्या पायवाटा मानवी संवेदनाच प्रकट करू लागतात, ह्याचा शंकर पाटलांनी घडविलेला प्रत्यय, खिळवून ठेवणाऱ्या व्यंकटेश माडगुळकरांच्या नवेगाव-बांधच्या पाऊलखुणा, मधुकर केच्यांच्या आखरातल्या रात्री, खेड्यातील बदलणाऱ्या नव्या व्यवसाय संस्कृतीचा यादवांनी चितारलेला मर्मभेदी आलेख, जग बदलत असूनही शंकरराव खरातांच्या आडवळणी गावाचा न बदललेला चेहरा, माणसातील आस्थेचा रणजित देसायांनी घेतलेला वेध, आपल्या मनाच्या कणसाचे कितीतरी पापुद्रे आपल्या कुणबी जबानीनं उलगडून दाखविणारी शिवाजी सावंतांची खडकावरची म्हातारी, आडदांड व्यक्तिमत्त्वाच्या बेबंद सखारामचा केशव मेश्रामांनी चितारलेला करूण अंत, लेकीच्या दुःखाने उन्मळून पडलेल्या ताईच्या मनाचं शांताबाई शेळक्यांनी अक्षरबद्ध केलेलं आक्रंदन, सरोजिनी बाबरांनी ग्रामीण स्त्रीजीवनासंबंधी व्यक्त केलेली चिंता, मधू मंगेश कर्णिकांच्या 'आंब्या-फणसाच्या,' चंद्रकुमार नलगे यांच्या खमंग हुरड्याच्या आणि महादेव मोरे यांच्या म्हाईच्या दिवसाच्या आठवणी, तसेच गुणसंपन्न आणि कलासंपन्न गोव्याची आणि गोवेकरांची सुभाष भेंड्यांनी घडविलेली दर्शने, 'लोकरंग'च्या पानापानांमधून वाचकांशी संवाद करतील.

आत्मीय भावबंधाला मानवी जीवनात अनुपम असे स्थान आहे. ज्या व्यक्तीशी, वस्तूशी, वास्तुशी किंवा स्थानाशी आपले भावबंध जडतात त्यासंबंधी ममत्व तर प्रकटतेच पण गहिवरही प्रकटण्याची दाट शक्यता असते. ही संभाव्यता नाकारता येत नाही. परंतु ग. दि. माडगूळकरांचा 'मोहरलेला कडुनिंब' आपले भावबंध जपतो तो अकृत्रिमतेने. त्यात दिमाख नाही की अहंकार. आपल्या गावाशी असलेले अनुबंध हा माडगूळकरांच्या वाङ्मयीन प्रेरणेचा विषय होतो आणि मग त्यांच्या मनात दाटून आलेल्या आठवणी अत्यंत सहजपणे प्रकट होतात. अशा वेळी त्यांची भाषाही प्रवाही होते. ह्या आठवणींना उत्कटतेचा आणि आत्मीयतेचा स्पर्श झाला म्हणजे प्रसंग कसे मोहरून येतात आणि हे प्रसंगच अनुभवांचे सजीवत्व कसे व्यक्त करतात माडगुकरांच्याच शब्दात अनुभवायला हवे.

'...दिवसाचा देव अगदी माथ्यावर आला होता. कृष्णेच्या विस्तीर्ण पात्रातील

वाळू तापून रणरण करीत होती. गावाकडील बाजूच्या गुडघाभर धारेलादेखील कड आला असावा. वाळवंटातील शिरगोळ्याप्रमाणं पाण्याचा पृष्ठभागही चमचम चमकत होता. पाणोठ्यावर आता चिटपाखरूही नव्हतं. नाही म्हणायला गावचा परीट आणि त्याची दणगट बायको खाली लांब परीटधुण्यावर एक पासोडी झोडपत होती. त्याचा आवाज डगरीपर्यंत येत होता. पलीकडच्या मळईत शेवरीची हिरवी झाडं स्तब्ध राहून नाइलाजानं उन्हात तापत होती. हालता येत असतं तर तीदेखील उठून म्हातारवडाच्या गार सावलीत येऊन कलंडली असती...'

गाव म्हटलं की परंपरा आणि त्या परंपरेने जोपासलेले वाडे सामाजिक घावांच्या खुणा म्हणूनच स्थिरपद झालेले. परंतु माडगूळकरांचा महारवाडा, मांगवाडा, रामोसवाडा, त्यांच्या गावचा चेहराच बदलून टाकणारे, स्वच्छ महारवाड्याने लेखकाच्या मनावर एक अपूर्व संस्कार केलेला. सर्व जाती-धर्माची माणसं परस्परांशी आपुलकीनं जिव्हाळ्यानं व्यवहार करतात. माडगूळकर स्वत:ला 'गावचं लेकरू' म्हणवून घेतात ते याच संपन्न अनुभवातून. 'मोहरलेला कडुनिंब' या प्रतीकात्मक शीर्षकातून लेखकाने संस्कृतीची नवी पदचिन्हे मनामनात साठविली आहेत. त्याचा एक सुंदर आलेख वाचकांच्या मनावर ठसतो तो सहजसुंदर अशा या लेखातील शब्दांकनाने.

माडगूळकरांच्या बदललेल्या गावाचे चित्र मनात ठसत असतानाच वरपांगी बदललेल्या पण आतून पूर्णत: पुराणमूल्यांशी तडजोड करणाऱ्या या देशातील दुसऱ्या एका गावाचे चित्र मनात सलत राहते. हे आडवळणी गाव आहे शंकरराव खरातांचे. गाव भौतिकदृष्ट्या बदलत असल्याचा भास होतो. कारण माणसं तीच जुन्या पोषाखाची, जुन्या वळणाची आणि कागदी चेहऱ्याची असतात. खरातांनी एका विलक्षण अलिप्ततेनं या दुसऱ्या गावाचं प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे. माणसांच्या स्थितीशीलतेची, एक जीवघेणी परिक्रमा येथे प्रत्ययाला येते. तकलादू नि खोट्या जगाची भीषणता बुद्धिवादी मनाला विलक्षण धक्का देते. गावात यंत्र आलं पण माणसं बदलत नाहीत हे एक विदारक वास्तव लेखकमनाला कसा दंश करते ते बघा-

'गाव नवे झाले तरी ती खरी वरवरचीच सुधारणा. बाहेरून बगळ्यासारखे सफेद, आत काळे अंत:करण. माणसात, गावात बाहेरून बदल होऊन काय उपयोग? खरा अंतरीचा बदल माणसात झाला पाहिजे. तेव्हाच तो खरा बदल म्हणता येईल. नाही तर बाहेर एक, आत दुसरे.'

नव्या गावात रस्त्यावर खांबाला दिवा लागला. त्याचा वाटेवर प्रकाश पडला. पण नव्या गावात माणसाच्याच अंत:करणात, मनात नव्या विचारांचा प्रकाश पडला पाहिजे, तरच रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाला शोभा आहे, नाही तर माणसाच्या मनात रूढीचा काळाकुट्ट अंधार असताना रस्त्यावरच्या दिव्याच्या प्रकाशाचा फक्त उपयोग काय?' (पृ. ३८)

खरातांची भाषा साधी, सरळ व निवेदनस्वरूप आहे. पण तरीही त्यांची विचारांची वीण मात्र घट्ट आहे. या विचारांच्या मागे चिंतनाचा धूसर असा पदर असतो.

आनंद यादव ग्रामीण कथाकार / कादंबरीकार. ग्रामीण जीवनातील वास्तवाचे प्रत्ययकारी चित्रण घडवून त्यांच्या लेखणीने आपले सामर्थ्य प्रकट केले आहे. शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर या पूर्वसूरींच्या खांद्यावरच त्यांचे लेखन उभे आहे. तरीही त्यांच्या स्वतंत्र खुणा त्यांच्या लेखनात जाणवतात. ग्रामीण जीवनातील बदलणाऱ्या मानसिकतेचे चित्र यादवांच्या 'बावीस एकरी' सारख्या ललित लेखात प्रभावीपणे प्रकट झाले आहे. शितोळे मास्तरांसारखा निवृत्त शिक्षक जेव्हा शेतीच्या व्यवसायात व्यावहारिक धोरणाने पडतो आणि गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी ज्या शिताफीने मिळवतो त्यात एक प्रकारचे 'थ्रील' आहे. शेतीव्यवहार करून बस्तान बसविणारा एकेकाळचा शिक्षक, थंडपणे एका 'वर्गा'चा कसा प्रतिनिधी बनतो याचे थक्क करून सोडणारे चित्र यादवांनी रेखाटले आहे. शितोळे मास्तर आता 'श्वेत' संस्कृतीचे घटक बनले आहेत. शेतमजुरी करणारी माणसं एकीकडे लाकडांच्या बाहुलीसारखी त्यांच्या अंगावरची कातडी हाडांना चिकटलेली, दारिद्र्याने थिजून गेलेले हे एका काळचे शेतकरी मालक आता मजूर होऊन शितोळे मास्तरांपुढे एका सधन शेतकऱ्यांपुढे आठवडी रोजीसाठी तळहात पसरत आहेत आणि अजूनही पन्नाशीतीलंच वाटणारे, गोरेपान, पांढऱ्याशुभ्र विजारीतील मास्तर आयुष्याचे चक्रवाढी गणित मांडत आहेत. ग्रामीण जीवनातील त्या भेदक वास्तवाचा, आनंद यादव

अत्यंत संयतपणे दंभस्फोट करतात. जणू दोन संस्कृतीतील विसंवादच ते शब्दबद्ध करतात. 'सगळ्यांच्या रक्तामांसांचा घाम होऊन तिथं गळत होता नि मास्तरांच्या बावीस एकरी शेताला खत मिळत होतं. त्यातनं एक पांढऱ्या विजारीचा शेतकरी सुधार जातीच्या उसासारखा डंग उगवत होता.' (पृ. ६४) नव्या शेतकऱ्यांचे नवे जग कसे आकाराला येऊ लागले आहे ह्याचे अत्यंत विदारक चित्र अत्यंत प्रभावीपणे यादवांनी चितारले आहे.

शिवाजी सावंतांची 'खडकावरची म्हातारी' कुटुंबवत्सल पण नेहमीच्याच परिचयाची वाटते. मात्र केशव मेश्रामांचा सखाराम सोकारी वाचकांना अस्वस्थ करीत राहतो. व्यक्तिचित्रांच्या बाबतीत एक समज असा आहे की, ती श्रेष्ठ व्यक्तींचीच असावीत. मग त्या कोणत्याही क्षेत्रातील असोत. परंतु हा समज योग्य नव्हे. सावंतांची 'म्हातारी' किंवा मेश्रामांचा 'सखाराम' ही सामान्य जीवन जगणारी माणसे आहेत. पण त्यांना लेखकांच्या शब्दशक्तीचा स्पर्श होताच ती कशी जिवंत होतात. त्याचे प्रत्यंतर येते. हे खरे आहे की, सामान्य वाचकांचे कुतूहल श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवनचित्रणात असते. मग तो राजकारणधुरंधर असेल, कलावंत असेल, योद्धा असेल, विक्रमी अंतराळवीर असेल आणि हे कुतूहल अखंड असते. ह्या श्रेष्ठ व्यक्ती विशिष्ट असा ध्येयवाद जगत असतात आणि ध्येयासाठी दिव्येही करीत असतात. त्यांच्या जीवनातील संघर्षशील, रोमहर्षक प्रसंग सामान्य वाचकांना आकृष्ट करीत असतात आणि लेखकही त्या त्या श्रेष्ठ व्यक्तींच्या जीवनातील असे प्रसंग चित्रित करण्यात धन्यता मानतात. पुष्कळदा त्यामागील भावना व्यक्तिगौरवाची किंवा व्यक्तिपूजनाची असते व त्यामुळे एक प्रकारची चाकोरी निर्माण होते. अशा श्रद्धेतून लिहिली गेलेली व्यक्तिचित्रे नेहमीच कलात्मक किंवा रेखीव होतील ह्याची शाश्वती नसते. उलट ती ठिसूळ व पोखरलेली होण्याची शक्यता असते. या पार्श्वभूमीवर लोकजीवनातील 'सखाराम'सारख्या व्यक्तिरेखा अधिक सजीव वाटतात. सखारामच्या व्यक्तिमत्त्वातील बेदरकारपणा, गैरशिस्त, कष्टाळूपणा, बेडरपणा, ताठरता, जगण्याची जिद्द अशा सर्व गुणदोषांचे रसायन असे काही बेमालूमपणे मेश्रामांनी तयार केले आहे की, वाचकांना एक वेगळी व्यक्तिरेखा अनुभूत होते. सावंतांची म्हातारीही लक्षात राहते ती तिच्यातील जीवलावूपणाच्या हळुवारतेमुळे आणि म्हणूनच लेखकाचा स्पर्श हा व्यक्तिचित्रणाचा गाभाच असतो, असे म्हटले पाहिजे.

'आंब्या-फणसाचे दिवस,' 'खमंग हुरड्याचे दिवस' आणि 'म्हाईचा दिवस' हे कोकणच्या, पश्चिम महाराष्ट्राच्या आणि कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमावरील प्रदेशांची आठवण करून देतात. चैत्र-वैशाखाची दारे उघडून आंब्या-फणसाचे दिवस कसे येतात. पौष महिन्यात झाडावर पिकलेल्या आंब्यांचे पिवळे शेंदरी घड कसे लोंबतात, वैशाखाच्या मध्याला फणसांना पिकल्याशिवाय कसं राहावत नाही, वैशाख संपता संपता मृगाच्या चाहुलीने, करांद्यांचे, चिन्यांचे आणि कणग्यांचे तांबडेलाल कोमल अंकुर कसे तरारून माना उंचावतात यांचे मोठे मनोवेधक व काव्यात्म चित्र मधू मंगेश कर्णिकांच्या 'आंब्या-फणसाचे दिवस' या लेखात येते. वेगवेगळे ऋतू, वेगवेगळे पक्षी आणि वेगवेगळी भाज्याफळे यांची वर्णने तर बहारदार आहेत, पण या सर्वांचे मध्यवर्ती केंद्र आहे लेखक आणि त्याचे मित्र. निसर्गाच्या विविध घटकांशी रममाण झालेली मानवी मनं किती सौंदर्यलक्ष्यी आणि सौंदर्यवेधी ! कर्णिकांचे शब्दांकनच त्याची ग्वाही देईल-

'आंब्या-फणसांच्या नि जांभळांच्या या दिवसांत एरवी उघड्याबोडक्या दिसणाऱ्या रानालासुद्धा एक शोभिवंत रूप येते. ठायीठायीची झाडे वसंतऋतूची लव्हाळी अंगावर लेवून उभी असतात. बकुळीला बहर येतो. सुरंगीवरही शे-दोनशे फुले शिल्लक असतात. मोगरा तडाकेबंद फुलतो. बाबलीच्या दारातला मोगरा, पान न् पान झडून सांगाडा राहिलेल्या शेवरीवर चढून असा बेबंद फुलतो, की ते शेवरीचे एरवी नग्न वाटणारे झाड शुभ्र वस्त्रात गुरफटल्यासारखे वाटते. तसाच राठ काळपट पानांच्या पारिजातालाही वेडा बहर येतो. पारिजातकाचा श्रावणात बहर किती वेगळा नि हा वैशाखातला बहर किती विलक्षण !

आणि भुईचाफा ! बिनपानांचे हे नाजूक फूल जमिनीतून हलकेच वर येते, अवघी बागशाई भारून टाकते.' (पृ. ११४)

दुर्गाबाईंच्या ऋतुचक्राची आठवण व्हावी ती क्षणभरच ! परंतु कर्णिकांचे कल्पना सौंदर्य आणि भावसौंदर्य मनात सारखे रेंगाळत राहते ते उपरोक्त नाजुकशार अशा वर्णनातून. व्यक्तित्वसंपन्नतेचे असे देखणेपण कर्णिकांच्या संबंध लेखात दरवळासारखे पसरून आहे.

हुरड्याच्या दिवसातल्या राखणदारांचा हाकारा, भरदार घोसांच्या देखण्या

जोंधळ्याच्या शिवाराचा पट्टा, झाडाझाडांवरून कलकलत जाणाऱ्या भोरड्यांच्या झुंडी, चिमण्या पाखरांचा गलका, पोपटांचे हिरवे थवे, पांढऱ्या बगळ्यांचा गस्तीचा पहारा ही सारी दृश्यचित्रे म्हणजे प्रा. चंद्रकुमार नलगे यांच्या मोहक शैलीचा प्रत्ययच. नलग्यांची भाषा काव्यात्म तर आहेच परंतु तिच्यात एक नाट्यही आहे. शब्दांनी वातावरण निर्माण करण्याचं फार मोठं कसब त्यांच्या लेखणीत आहे. याचा प्रत्यय त्यांच्या 'खमंग हुरड्याच्या खमंग दिवसा'त येतो. लेखाचे शीर्षक खमंग असले तरी लेखकाची भाववृत्ती तरल आणि संवेदनक्षम आहे, यात शंका नाही. आपल्या मातीचा संस्कार घेऊन आलेल्या नलग्यांची भाषा जशी चित्ताकर्षक आहे अशी अर्थवाही शब्दांची पेरणी सार्थ आणि समुचित अशी आहे.

एक आगळावेगळा लोकजीवनाचा अनुभव प्रकट करणारा महादेव मोरे यांचा 'म्हाईचा दिवस' खऱ्या अर्थाने खमंग आहे, असे म्हणता येईल. ग्रामीण जीवनातील अस्सलपणाचा बाज येथे आकळतो. एका जीवन-पद्धतीचा आणि सांस्कृतिक विशेषांचा हा दस्तऐवजच होय. त्यामुळेच आपल्या मनातील सोवळेपणाच्या कल्पनांना धक्का बसतो आणि आपल्या मनातील पारंपरिक शुचितेच्या कल्पना किती वरवरच्या आहेत ह्याचा एक आगळा प्रत्यय येतो. ग्रामीण जीवन किती वैविध्याने भरले आहे, त्याची अव्यक्त रूपे म्हणजे संस्कृती आणि सभ्यतेची चित्रदर्शी दर्शने याचा आलेख मोऱ्यांसारखा सक्षम लेखक कसा चितारतो हे पाहण्यासारखे आहे. लोकजीवनातील श्रद्धा, पारंपरिकता आणि त्यात विरून जाण्याची प्रवृत्ती म्हणजे माणसांच्या खोलवर रूतलेल्या मानसिकतेच्या मुळ्याच. 'म्हाईचा दिवस' ही त्याची साक्ष आहे. अनेक तपशिलांसह लेखक या मानसिकतेचे बारकावे व्यक्त करतो तेव्हा हे तपशील पाल्हाळिक होत नाहीत हे विशेष. म्हाईच्या दिवसाची आतुरतेने वाट पाहणारे लोक, लेकी-सुना, काळभैरीसाठी म्हाई करायची. बकरं कापून त्यालाच त्याचं रक्त अर्पण करणं, बकऱ्याचं मास चुलीवरील हंड्यात रटरट शिजताना चविष्ट-खमंग वासानं तरंगून जाणं, हातपाय धुवून बसलेल्या पंगती, त्यानंतरचा महारांचा तमाशा, त्यातच संपून गेलेली रात्र, हे सारे प्रसंग लेखकाने साक्षात् उभे केलेले आहेत. हे प्रसंग म्हणजे लोकजीवनाचे अतूट धागे होत. प्रतिष्ठितपणाची खोटी झूल अंगावर न घेता किंवा सोवळेपणाचे फाजील प्रदर्शन न करता लेखक जे लोकजीवन त्याच्या वैशिष्ट्यांसह उभे करतो ते मध्यमवर्गीय किंवा नागरी जीवन नव्हे याची सतत जाणीव करून देते. 'लोकरंग'मधील महादेव मोऱ्यांचा वाण वेगळा आहे ह्यात शंका नाही.

कवी अपरिहार्यपणे ललित गद्यलेखक असतोच असे नाही. परंतु मराठीतील अनेक कवींनी समृद्ध असे ललित लेखन केले आहे. नावेच आठवायची तर कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मधुकर केचे, केशव मेश्राम, मंगेश पाडगावकर, शांता शेळके यांची नावे सहजच आठवतील. काव्याच्या प्रांतात दिंडी घेऊन जाणारे मधुकर केचे ललितलेखनाच्या प्रांतातही आपला वऱ्हाडी ढंग घेऊन उभे आहेत. त्यातली खुमारी व ठसका जादाच आहे. केच्यांच्या निवेदनशैलीला मिस्किलपणाचे अंगही आहे. ह्या साऱ्या विशेषांची प्रचीती त्यांच्या 'आखारातल्या जागणाऱ्या रात्री'त येते. आखरात झोपणाऱ्या लोकांच्या गप्पांतून, आखरात झोपायला, धावत धावत येणाऱ्या आणि कुणाच्या तरी अंगावर धाडकन् कोसळणाऱ्या पुंडलिक पाटलांच्या स्वभावातून अनेक आठवणींचे धागेही ते सहजतेने उलगडतात. क्वचित काही प्रसंगात कोरडेपणा असला तरीही प्रसंगांची गुंफण करण्याची त्यांची लकब ढंगदार आहे. केचे मुळातच कवी असल्याने, कविमनाचे प्रतिबिंब एखाद्या परिच्छेदात कसे प्रकटते ते पाहता येईल-

'वावरे चांदी फुलल्यासारखी दिसतात. बोंडांतली रग बाहेर फुटून चमकते आणि डोळे दीपवते. पानांच्या हिरव्या आंथरीवर हे रानलक्ष्मीचे डोळे हिऱ्याप्रमाणे चमकतात; जोडीला असतात कांबोडीची पिवळी-लाल फुले. हिरवे हिरवे आकाश बोंडातून फुटलेल्या लसलसणाऱ्या नक्षत्रांनी नुसते भरून निघते आणि त्याच आकाशात रंगीत फुलांचे थवे इंद्रधनुष्याशी नाते सांगतात. पुढे पुढे तर कापसाचा जोर असा वाढतो की, पऱ्हाटीवरची हिरवी पानेच दिसेनाशी होतात. काही काळवंडून भुईभेट होतात. उरतो केवळ कापूस. त्यांचे मस्त दोन-तीन वेचे होतात. मग कापूस संपलेले पऱ्हाटीचे सांगाडे तेवढे उरतात. अति भकास. त्यातही चालू मालाचे झाड असते एरंडासारखे उंच ! ते कसेसेच वाटते. ते कसे बसे उभे असतात. जमिनीची मायाच तशी चावट म्हणून तशाही अवस्थेत एकटीदुकटी हिरवी पाने त्या भाकड झाडावर आढळतात. पण त्या सरत्या हिरव्या हुंदक्यांना फारसे मोल नसते.' (पृ.६५)

वावरातल्या कापूससुगीचे चित्र कसे दृश्यस्वरूप होते याचेच हे प्रत्यंतर !